प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
घोडेगांव ता. आंबेगांव जि . पुणे
नविन प्रशासकीय इमारत घोडेगांव ता. आंबेगांव जि. पुणे
दुरध्वनी क्रमांक- ०२१३३-२४४२६६ फॅक्स क्र. ०२१३३-२४४२७७

महाराष्ट्र शासन

जा.क्र.भासशि २०२० / प्र.क्र. ३ (४)5618 घोडेगांव

दिनांक ०५/११/२०२०

प्रती,
प्राचार्य
सर्व महाविद्यालय,
----------------------
(अनु/विनाअनुदानीत महाविद्यालय पुणे,सातारा,सांगली व कोल्हापूर)

विपय:- महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबीत अर्जाबाबत.

संदर्भ;- १.मा. आयुक्त आ. वि.(म.रो.) नाशिक यांचेकडील पत्र क्र. शिष्यवृत्ती २०२० / प्र.क्र.०१/का ६ ( ९) ४०८६ दिनांक ४ नोव्हेंबर २०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्र. भासशि. १२१५ / प्र.क्र./३(४)/२९६० दिनांक ६ ऑगष्ट २०१९

उपरोक्त विषयान्वये या कार्यायाच्या अधिनस्त येणा-या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, महाडिबीटी या संकेत स्थळावर सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाडिबीटी या संकेतस्थळावर या विभागाच्या ४ शिष्यवृत्ती योजनांची अमलबजावणी माहीती तंत्रज्ञान संचालयाने विकसित केलेल्या संकेतस्थळ मार्फत करण्यात येत आहे.

सद्यास्थितीत कोवीड -१९ चा प्रादुभाव असल्याने शिष्यवृत्ती येण्यास विलंब होत असून त्याबाबत अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम अदयाप न मिळाल्याने त्यांना उर्तीर्ण प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे देण्यास महाविद्यालय टाळाटाळ करत असले बाबत संदर्भ ०१ अन्वये वरीष्ठ वरीष्ठ कार्यालयाने कळविले आहे. त्याकरीता आपणास सुचीत करण्यात येते की, या कार्यालयामार्फत महाडीबीटी या संगणक आज्ञवलीवरील मंजूर करण्यात आलेले अनु. जमातीचे विद्यार्थ्याचे शिष्यवृत्ती करीता पात्र ठरलेल्या तथापि शिष्यवृत्ती वितरीत न झालेल्या व सन २०१९-२० या वर्षात अभ्यासक्रम पुर्ण होत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यापोटी देय असलेली रक्कम संबधित महाविद्यालयास लवकरच अदा करण्यात येणार असल्याचे संदर्भ क्र १ अन्वये कळविण्यात आले आहे.तरी या बाबत अनु. जमाती विद्यार्थ्याची कागदपत्र बाबत कोणतीही अडवणूक करण्यात येवू नये याबाबत या कार्यलयास यासंबधी तक्रार प्राप्त झाल्यास संबधीत महाविद्यालयांवर शासन नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
घोडेगांव ता. आंबेगावं जि. पुणे

प्रत,
१.मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय , नाशिक
२. मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे

Scanned with CamSc